# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.06.2026** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली “प्रगती” मंचाची 52वी बैठक; 30 हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पाचा घेतला आढावा
2. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आजपासून तीन दिवसांच्या ब्रिटनच्या दौऱ्यावर
3. महिला T 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, भारत आणि बांगलादेश यांच्यात आज लढत आणि
4. व्हेनेझुएला आणि जपानमध्ये भूकंप; मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानीची भीती

**प्रगती बैठक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली मध्ये 'प्रगती' मंचाची 52 वी बैठकी पार पडली. या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी चार राज्यांमधील रस्ते, वीज, मेट्रो तसच रेल्वे क्षेत्रातील जवळपास 30 हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पाचा आढावा घेतला. विकास प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना पंतप्रधानांनी दिल्या. या बैठकीत टीबी मुक्त भारत मोहिमेचाही आढावा घेण्यात आला. क्षयरोग निर्मूलनासाठी एआयचा वापर करण्यावर यावेळी चर्चा झाली. क्षयरोग जनजागृती अभियानासाठी एनसीसी छात्र आणि माय भारत स्वयंसेवकांची मदत घेण्याची सूचनाही पंतप्रधानांनी केली. सायबर गुन्हे आणि डिजिटल अरेस्ट संदर्भातील विविध तक्रारींचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

**भारत-आर्मेनिया**

आर्मेनियामध्ये नुकत्याच झालेल्या संसदीय निवडणुकांमधल्या विजयाबद्दल आर्मेनियाचे पंतप्रधान निकोल पशिन्यान आणि त्यांच्या पक्षाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. काल आर्मेनियाच्या पंतप्रधानांनी मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. पश्चिम आशियातल्या घडामोडींनंतर इराणमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल पंतप्रधान मोदींनी त्यांचे आभार मानले. भारत आणि आर्मेनिया यांच्यातील व्यापार, संरक्षण, तंत्रज्ञान आणि नागरिकांमधील मधील परस्पर संबंध यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमधली भागीदारी अधिक दृढ करण्यावर भर देणार असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे.

**ब्रिक्स**

11 वी ब्रिक्स ऊर्जा परिषद आज आणि उद्या हरियाणातील गुरुग्राम मध्ये होत आहे. भारत या परिषदेचं यजमानपद भूषावणार आहे. ही बैठक प्रमुख्यानं ऊर्जा सुरक्षा आणि शाश्वतता, ऊर्जेची उपलब्धता तसंच तंत्रज्ञान आणि नवोपक्रम या तीन महत्वाच्या मुदद्यांवर केंद्रित असेल. या बैठकीत 'ब्रिक्स'च्या सदस्य देशांचे ऊर्जा मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार आहेत. या वर्षी भारताच्या 'ब्रिक्स' अध्यक्षपदाची संकल्पना नवोपक्रम, सहकार्य आणि शाश्वतता यासाठी उभारणी' ही असणार आहे.

**गोयल युएस**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आजपासून तीन दिवसांच्या ब्रिटनच्या दौऱ्यावर जात आहेत. भारत आणि ब्रिटनमध्ये होत असलेल्या आर्थिक आणि व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर हा दौरा होत आहे. या भेटीदरम्यान गोयल युकेचे वाणिज्य आणि व्यापार मंत्री पीटर कोइल यांच्याशी उच्चस्तरीय द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. व्यापार कराराच्या अंमलबाजावणीच्या तयारीवर या चर्चेत भर असेल.

**<u>ग्रामीण राष्ट्रीय कार्यशाळा</u>**

ग्रामीण विकास विभागातर्फे नवी दिल्लीमध्ये आज ग्रामीण विकासात ए आय चा वापर करण्याबाबत राष्ट्रीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय योजनांवर विचार मंथन करण्याकरता ही कार्यशाळा घेतली जात आहे. या विषयावर काम करणाऱ्या व्यक्ति आणि संस्था, तज्ञ तसंच उद्योग आणि स्टार्ट अपचे प्रतिनिधि यात सहभागी होणार आहेत.

**<u>संविधान हत्या दिवस</u>**

1975 मध्ये आजच्या दिवशी देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती. त्या घटनेचं स्मरण म्हणून आज संविधान हत्या दिवस पाळला जात आहे. आणीबाणीच्या काळात देशासाठी प्राण गमावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसंच संविधानाचं आणि लोकशाहीचं मूल्य नागारिकांना समजावं यासाठी आज देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>युवा सांसद स्पर्धा</u>**

केंद्रीय विद्यालयांसाठीच्या छत्तिसाव्या राष्ट्रीय युवा सांसद स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आज नवी दिल्लीत संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या उपस्थितीत होणार आहे. ही स्पर्धा देशभरात 25 विभागातल्या 200 शाळांमध्ये आयोजित करण्यात आली होती. युवा सांसद योजनेचा उद्देश तरुण पिढीमध्ये स्वयंशिस्त, आणि लोकशाही मूल्य रुजवणे हा आहे. पुण्याच्या हवाईदल तळावरच्या पीएमश्री केंद्रीय विद्यालयाचा प्रादेशिक विजेत्यांमधे समावेश आहे.

**<u>मुख्यमंत्री-फडणवीस</u>**

ॲमेझॉनने राज्यामध्ये गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांच्या समवेत काल मुख्यमंत्र्यांनी राज्यातील गुंतवणुकीच्या संधीवर चर्चा केली. 'डेटा सेंटर्स' क्षेत्रात महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे. डेटा सेंटरचा विस्तार आणि विकासासाठी राज्यात उत्तम परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. केवळ डेटा सेंटर्स नाही, तर राज्यात आरोग्य, तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कौशल्य विकास यामध्ये मोठ्या गुंतवणुकीच्या संधी आहेत, असं फडणवीस म्हणाले.

नाशिकमध्ये TCS कंपनीत झालेला महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावल्याचं प्रकरण, अशा घटनांचा अभ्यास करण्यासाठी आणि महिला सुरक्षेसंदर्भातील कायद्यांच्या पुनरावलोकनासाठी महिला सदस्यांची समिती स्थापन करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी काल विधानपरिषदेत दिली.

**<u>सावंत-देसाई भेट</u>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे 6 खासदार पक्षातून बाहेर पडल्याप्रकरणी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांनी काल लोकसभा सभापती ओम बिरला यांची भेट घेतली. एका पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले खासदार दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाहीत, त्यांची संख्या पक्षाच्या एकूण खासदारांच्या दोन तृतीयांश असली तरीही संविधानातल्या 10व्या अनुसूचीतल्या तरतुदीनुसार हे करता येणार नाही असं आपण सभापती बिरला यांना सांगितल्याची माहिती अनिल देसाई यांनी वार्ताहरांना दिली. या प्रकरणी सभापती संविधान आणि लोकशाहीचा आदर करणारा निर्णय घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>हॉकी-इंडिया</u>**

भारताचा कनिष्ठ महिला हॉकी संघ पुढील महिन्याच्या 5 ते 14 तारखेदरम्यान ब्रिटनच्या दौऱ्यावर जाणार आहे. या 24 सदस्यांच्या संघाची घोषणा हॉकी इंडियाने केली आहे. नवीन प्रशिक्षक टिम व्हाईट यांच्या मार्गदर्शनात, हा संघ कनिष्ठ गटाचा आशिया चषक, तसंच विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीचा भाग म्हणून स्कॉटलंड आणि इंग्लंडमध्ये सात सामने खेळणार

आहे. या युवा संघाचे नेतृत्व कर्णधार खैदम शिलेमा चानू करणार आहे. नऊ दिवसांच्या या दौऱ्याची सुरुवात स्कॉटलंडच्या संघाविरुद्धच्या दोन सामन्यांनी होईल आणि त्यानंतर भारतीय संघाचे सामने अमेरिका, इंग्लंड आणि बेल्जियमच्या संघांविरुद्ध होतील.

**<u>T20 विश्वचषक</u>**

महिला T 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत, अ गटात भारत आणि बांगलादेश यांच्यात आज लढत होणार आहे. मँचेस्टरमधल्या एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर संध्याकाळी 7 वाजता हा सामना सुरू होईल. या स्पर्धेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात भारतीय संघ आतापर्यंत 3 पैकी 2 सामने जिंकून दुसऱ्या स्थानावर आहे. तर बांगलादेश चौथ्या स्थानावर आहे. भारताने या स्पर्धेत पाकिस्तान आणि नेदरलँड्सविरुद्ध विजय मिळवला. मात्र, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला.

**<u>भूकंप</u>**

व्हेनेझुएलामध्ये याराकुय राज्यातील युमारे शहरात आज सकाळी भूकंपाचा मोठा धक्का बसला. याची तीव्रता 7 पूर्णांक 5 रिखटर स्केल होती, अशी माहिती 'यूएस जिओलॉजिकल सर्व्हे'नं दिली आहे. युमारे इथल्या भूकंपाच्या 39 सेकंद आधी सॅन फेलिप इथंही 7 पूर्णांक 2 तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवल्याचं 'यूएस जिओलॉजिकल सर्व्हे'नं म्हटलं आहे. या भूकंपामुळे झालेल्या नुकसानाबाबत अजून नेमकी माहिती मिळाली नाही, मात्र या आपत्तिमध्ये जीवित आणि मालमत्तेचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं असण्याची शक्यता आहे. जपानच्या उत्तरेकडील भागातही आज सकाळी 6 पूर्णांक 9 तीव्रतेचा भूकंप झाला. टोकियोमध्येही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. मात्र, त्सुनामीचा कोणताही इशारा देण्यात आलेला नाही आणि यात कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही. दरम्यान, या भूकंपाच्या पार्श्वभूमीवर जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने एका विशेष कृती दलाची स्थापना केली आहे.

**<u>हवामान</u>**

देशाच्या विविध भागात आज मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कर्नाटक किनारपट्टी, झारखंड, तेलंगणा, ओदिशा, तसच कोकण, गोवा आणि राज्याच्या काही भागातही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत दिल्ली, चंदीगढ, हरियाणा, जम्मू-काश्मीरसह ईशान्येकडील काही भागांत विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळी पावसाचा अंदाजही विभागानं वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.